MHSN090006472018

# <u>दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, तासगांव, जि. सांगली</u>

(पीठासिन अधिकरी श्री. किरण रा. खोंद्रे)

**<u>नियमित दिवाणी दावा क्रमांक ९६/२०१८.</u>**
**<u>निशाणी क्रमांक २७ खालील आदेश.</u>**

| | | |
|---|---|---|
| ०१. | श्री. राकेश लालासाहेब पाटील. | **<u>वादी</u>.** |
| | ***विरुध्द*** | |
| ०१. | श्री.दिनकर गणपती झरेकर वगैरे ३. | **<u>प्रतिवादी</u>.** |

**(०१).** वादी यांनी प्रस्तुत अर्ज दिवाणी प्रक्रिंया संहिता आदेश ०६, नियम १७ अन्वये दावा दुरुस्तीकरणेकरीता दाखल केलेला आहे. प्रस्तुतचा दावा वादी यांनी प्रतिवादीचे विरुध्द निरंतर ताकिदीकरीता दाखल केलेला आहे. वादी यांचे कथन की, दावा कलम ३ मधील "व वादीचे वडीलांनी व प्रतिवादी नं.०१ यांन एकमेकांचे विचाराने व कृतीने वर नमुद केलेला गहाणाचा व्यवहार हा संपुष्टात आणलेला होता व आहे" हा मजकुर दाव्याचे कामी अनावश्यक आहे. सबब, सदर मजकूर दाव्यातून कमी करण्याकरीता वादीने प्रस्तुतचा दावा दुरुस्तीचा अर्ज दाखल केलेला आहे.

**(०२).** प्रतिवादी क्र.०१ ते ०३ यांनी निशाणी क्रमांक २९ येथे त्यांचे म्हणणे दाखल करुन वादीच्या अर्जास हरकत घेतली आहे. प्रतिवादी यांचे कथन असे की, सदरचा अर्ज दाखल करण्याचा वादीस हक्क अगर अधिकारी नाही.

वादीने मागितलेल्या दावा दुरुस्तीमुळे दाव्याच्या स्वरुपात अमुलाग्र बदल होणार आहे. मे. कोर्ट वादीचा अर्ज मंजूर करण्याच्या निर्णयाप्रत आल्यास प्रतिवादींना वादीकडून जास्तीत जास्त कॉस्ट देण्यात यावी. अशी विनंती प्रतिवादी यांनी केलेली आहे.

**(०३).** वादीचा अर्ज, प्रतिवादींचे म्हणणे, विचारात घेता प्रसतुचा अर्ज निर्णीत करणेहेतु माझे समोर खालील वादप्रश्न उपस्थित होतात. त्यांचे सकारण स्पष्टीकरण व कारणमिमांसा मी खालील प्रमाणे देत आहे.

| अ.क्र. | वादप्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| ०१. | प्रस्तावित दुरुस्तीमुळे दाव्याचे मुळ स्वरुप बदलते काय ? | **नाही.** |
| ०२. | उभय पक्षकारांमधील वादाचे गुणदोषावर पुर्णतः निराकरण करणेसाठी प्रस्तुत दुरुस्ती आवश्यक आहे काय ? | **होय.** |
| ०३. | खटल्यांची अनावश्यक गुंतागुंत/पुनरावृत्ती टाळण्यासाठी प्रस्तुत दुरुस्ती आवश्यक आहे काय ? | **होय.** |
| ०४. | काय आदेश ? | **अर्ज मंजुर करणेत आला.** |

**<u>कारणमिमांसा.</u>**

**<u>वादप्रश्न क्रमांक ०१ ते ०३ करिता.</u>**

(०४). सदरील वादप्रश्न हे परस्परात गुंतले असल्याने तथ्यांची पुनरावृत्ती टाळणेहेतु एकत्रीत विचारात घेतले आहेत. दोन्ही बाजूच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला. कबुल तथ्यानुसार वादीने हा निरंतर ताकिदीकरिता दाखल केला आहे. वादी मागणी करीत असलेली दुरूस्ती ही तांत्रीक आहे. प्रस्तावित दुरूस्ती मंजुर केल्याने निरंतर चे मनाई च्या दाव्याचे स्वरूप नक्कीच बदलत नाही, उभय पक्षकारांमधील वादाचे गुणदोषावर पुर्णतः निराकरण करणेसाठी प्रस्तुत दुरुस्ती आवश्यक आहे आणी खटल्यांची अनावश्यक गुंतागुंत/पुनरावृत्ती टाळण्यासाठी प्रस्तुत दुरुस्ती आवश्यक आहे असे माझे मत आहे. याचे कारण असे आहे की, प्रस्तावित दुरूस्ती नामंजुर केलेस वादीस याच मिळकती करिता, याच प्रतिवादीं विरूध्द आणी याच न्यायालयात नव्याने दावा दाखल करावा लागणार आहे, की जे हा अर्ज मंजुर करून टाळता येणारे आहे. तसेच प्रतिवादींना होणारा त्रास हा द्रव्यदंडावर भरून दिला जाऊ शकतो व प्रतिवादींना त्यांची ज्यादा कैफियत दाखल करणेचा अधिकार आहेच. या सर्व तथ्यांचा विचार करता मी **वादप्रश्न क्रमांक ०१ नकारार्थी आणी ०२ ते ०३ होकारार्थी** ऊत्तरी करून, वादप्रश्न क्रमांक ०४ चे उत्तरादाखल मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

## आदेश

**०१.** निशाणी क्रमांक २७ वरील अर्ज रक्कम रूपये २५०/- च्या द्रव्यदंडावर मंजुर करण्यात येतो.

**०२.** द्रव्यदंड प्रतिवादींना दिलेशिवाय हा आदेश अंमलबजावणीस पात्र राहणार नाही.

**०३.** अर्जाचा खर्च वादीवर राहील.

KIRAN RAJARAM KHONDRE
Digitally signed by KIRAN RAJARAM KHONDRE
Date: 2022.04.04 17:34:21 +0530

**तासगांव.** (किरण रा. खोंद्रे)
दिनांक : ०४ एप्रिल २०२२. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
**तासगांव**.

मी हमी देतो की, सदरच्या पी.डी.एफ. फाईल मधील सर्व मजकूर हा मुळ आदेशातील प्रत्येक शब्दानुसार बरोबर आहे.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नाव | – श्री. अभय अरविंद रणदिवे |
| न्यायालय | – दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, तासगांव, जिल्हा सांगली. |
| दिनांक | – ०४ एप्रिल २०२२. |
| न्यायीक अधिकारी यांनी सही केलेली दिनांक | – ०४ एप्रिल २०२२. |
| आदेश अपलोड दिनांक | — ०४ एप्रिल २०२२. |